# शेतकरी

■ सप्टेंबर २०१६ ■ किंमत २५ रुपये

१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक. घामाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन उत्कर्षाच्या वाटेवर...



# बातम्यांच्या बांधावर



मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबादच; कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी; डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद; चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज अॅन्ड अॅग्रिकल्चर; महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अॅन्ड अॅग्रिकल्चर तसेच इन्स्टिट्यूशन ऑफ अॅग्रिकल्चर टेक्नॉलॉजिस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील शेतीचे भवितव्य या विषयावरील 'कृषि परिषदेचे' उद्घाटन औरंगाबाद येथे दि. १० ऑगस्ट २०१६ रोजी मा. राज्यपाल श्री. सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते संपन्न झाले. जागतिक स्तरावरील हवामान बदलाचे परिणाम जाणवत राहणार आहेत. तसेच सततच्या अवर्षणाला खंबीरपणे आणि संयमाने तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांचे कौतुक करावेच लागेल. परंतु आता परिणामांना तोंड देण्याची तयारी ठेवलीच पाहिजे. मराठवाडा विभागातील कोरडवाहू शेतीचे मोठेक्षेत्र लक्षात घेता येथे मृद व जलसंधारणाची मोठी गरज आहे. तद्अनुषंगाने शासन प्रयत्न करत आहे. शास्त्रोक्त पध्दतीने शेती केली तर भविष्यामध्ये मराठवाडा विभाग अन्नधान्याचे कोठार बनू शकते. कोरडवाहू फळबागांवार लक्ष केंद्रित केले तर येथे बहुराष्ट्रीय कंपन्या फळप्रक्रिया उद्योग उभारतील, असे मत मा. राज्यपाल महोदयांनी यावेळी व्यक्त केले. या कृषि परिषदेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी विधानसभेचे अध्यक्ष मा. ना. श्री. हरिभाऊ बागडे होते तर या कार्यक्रमास राज्याचे वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सविकास राज्यमंत्री मा. ना. श्री. अर्जुनराव खोतकर, औरंगाबाद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मा. श्रीराम महाजन, कृषि आयुक्त मा. श्री. विकास देशमुख, विभागीय आयुक्त मा. डॉ. उमाकांत दांगट, जिल्हाधिकारी मा. निधी पांडेय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु, डॉ. बी. वेंगटश्वरलु, संयोजक संस्थांचे प्रतिनिधी आदि मान्यवर, पदाधिकारी विविध विभागांचे अधिकारी तसेच शास्त्रज्ञ उपस्थित होते.



सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग आणि महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्या वतीने विधानभवनाच्या आवारात मुंबईतील पहिल्या 'संत शिरोमणी सावता माळी आठवडे बाजाराचे' उद्घाटन दि.१४ ऑगस्ट २०१६ रोजी मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते झाले. शेतकऱ्यांना अडत्यांच्या जोखंडातून मुक्त करुन त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळावा, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्यातून राज्यात मोठया प्रमाणावर शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे समूह तयार करावेत, असे आवाहन मा.मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी केले. थेट शेतकरी ते ग्राहक या योजनेंतर्गत आठवडा बाजाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य भाव तर ग्राहकांना वाजवी दरात भाजीपाला मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास विधानसभेचे अध्यक्ष मा.ना.श्री.हरिभाऊ बागडे, सहकार,पणन व वस्त्रोद्योग मंत्री मा.ना.श्री.सुभाष देशमुख, गृहनिर्माण मंत्री मा.ना.श्री.प्रकाश मेहता, कृषि, फलोत्पादन व पणन राज्यमंत्री मा.ना.श्री.सदाभाऊ खोत, गृहराज्यमंत्री मा.ना.श्री. दिपक केसरकर, जलसंपदा राज्यमंत्री मा.ना.श्री.विजय शिवतारे, खासदार मा.श्री.राजू शेट्टी, आमदार मा.श्री.राज पुरोहित व मा.राहूल नार्वेकर, पणन विभागाचे अपर मुख्य सचिव मा.श्री.सुनिल पोरवाल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मा.श्री. प्रवीण परदेशी तसेच इतर मान्यवर, पदाधिकारी, अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.





दि. २५ ऑगस्ट २०१६ रोजी पुणे येथे कृषि आयुक्तालयातील पद्मश्री सभागृहामध्ये कृषि विभागाची आढावा बैठक कृषि व फलोत्पादन मंत्री मा.ना.श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीमध्ये आयुक्त कृषि मा. श्री. विकास देशमुख तसेच विस्तार व प्रशिक्षण आणि नि. व गु. नि. विभागाचे कृषि संचालक श्री. कृ. वि. देशमुख, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचे व मृद व जलसंधारण विभागाचे संचालक श्री. सु. ल. जाधव, फलोत्पादन संचालक श्री. एम. एस. घोलप, आत्मा विभागाचे संचालक श्री. एस. बी. खेमनर, नियोजन व कृषि प्रक्रिया विभागाचे संचालक श्री. पी. एन. पोकळे तसेच आस्थापना विभागाचे कृषि सहसंचालक श्री. एस. एस. ननवरे आदि अधिकाऱ्यांनी आढावा व प्रगती सादर केली. तसेच कृषि विभागामार्फत दरमहा प्रसिध्द होणाऱ्या 'शेतकरी' मासिकाच्या माहे ऑगस्ट -२०१६ च्या अंकाचे त्याचबरोबर फलोत्पादन विभागाने तयार केलेल्या 'कृषिमाल निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी कृषि विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सोयी -सुविधा' या घडीपत्रिकेचे विमोचन मा. मंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले. कृषि विभागातील रिक्त पदांची संख्या मोठी आहे. प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोचण्यासाठी विभागात मनुष्यबळाची मोठी आवश्यकता आहे. तद्अनुषंगाने कृषि विभागाला गती देण्याच्या दृष्टिकोनातून पावले उचलावी लागणार आहेत. शासन शेतकऱ्यांच्या बाजूने असल्याने योग्य निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्यात येईल. असे प्रतिपादन मा. मंत्रीमहोदयांनी यावेळी मार्गदर्शन करताना केले. या बैठकीस कृषि आयुक्तालयातील कृषि सहसंचालक, अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि उपसंचालक आदि अधिकारी उपस्थित होते.